दैनिक

# मराठवाडा पत्र

छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

मंगळवार
२१.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २८५
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१







# एका पराठ्यामुळे सापडला सैफचा हल्लेखोर

## पोलिसांच्या जाळ्यात कसा अडकला ?

मुंबई, (वृत्तसेवा):- अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला करणारा आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद उर्फ विजय दास (३०) याला ठाण्यातून अटक करण्यात पोलिसांना यश आलं. आरोपी बांगलादेशी नागरिक असून घुसखोरी करून देशात आल्याचे प्राथमिक चौकशीतून निष्पन्न झाले आहे. दरम्यान, त्याने एका ठिकाणी जीपेच्या माध्यमातून व्यवहार केल्याने त्याचा ठावठिकाणा लागला. त्यामुळे ७० तास गुंगारा देणाऱ्या आरोपीला पोलिसांना पकडता आले, असे वृत्त इंडियन एक्स्प्रेसेने दिले आहे. आरोपीने वरळीतील सेंच्युरी मिलजवळील एका स्टॉलवर पराठा आणि पाण्याच्या बाटलीसाठी गुगल पे द्वारे युपीआय व्यवहार केला होता. या व्यवहारामुळे पोलिसांना आरोपीचा मोबाईल क्रमांक मिळाला. या मोबाईल क्रमांकाच्या आधारे पोलीस त्याच्या मागावर होते. त्याचे लोकेशन ट्रॅक करून पोलीस ठाण्यातील कामगार वस्तीपर्यंत पोहोचले. कामगार वस्तीत शोधाशोध करूनही तो सापडला नाही. अखेर त्याने थोड्यावेळा करता मोबाईल फोन सुरू केला असता पोलिसांना तो कांदळवनातील जंगलात लपला असल्याचं समजलं. त्यानुसार टॉर्चच्या आधारे पोलिसांनी त्याचा ठाण्यातील घनदाट जंगलात शोध घेतला. त्याचा मोबाईल नंबर सापडल्यानंतर जवळपास १०० पोलिसांच्या पथकाने ▶▶पान २ वर



### ...अन् आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश

दरम्यान, ठाण्यातील कासारवडवली येथे अमित पांडे नावाच्या कंत्राटदाराने त्याला काही महिन्यांपूर्वीच कामावर ठेवले होते. त्याचा मोबाईल नंबर पोलिसांसाठी टर्निंग पॉइंट ठरला. जवळपास २० पथके ठाण्यात पोहोचली आणि संशयिताचा शोध सुरू केला. परंतु, तो घटनास्थळावरून पळून गेला आणि शनिवारी रात्री १० च्या सुमारास त्याने आपला मोबाइलही बंद केला. परंतु, थोड्यावेळाने तो ठाण्यातील जंगलात लपल्याची माहिती मिळाली. डीसीपी नवनाथ ढवळे यांच्या नेतृत्त्वाखाली पथकाला तो एका झुडप्याखाली लपल्याचं दिसलं. त्यामुळे त्याला अटक करण्यात पोलिसांना यश आलं.

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली नगरपालिकेची आढावा बैठक

## बीड शहरातील नागरी प्रश्नांबाबत दिले निर्देश



बीड दि.२० (प्रतिनिधी) - शहरातील मुलभूत नागरी प्रश्नांच्या संदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२०) रोजी नगर पालिकेची आढावा बैठक घेतली. स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, वीज आदि मुद्यावरून आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकार्यांना सुनावले. प्रत्येकवेळी कोणतेही काम सांगितले तर निधी नाही असे कारण सांगणार्या अधिकार्यांनी नगर पालिकेचे उत्पन्न वाढीसाठी काय प्रयत्न केले ? असा सवालही आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला. पाणी पुरवठ्यात हयगय खपवून घेणार नाही. स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य द्या आणि उत्पन्न वाढीच्या दृष्टीने तात्काळ उपाययोजना करा असे निर्देश यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिले. बीड नगर पालिकेतील मुख्याधिकार्यांच्या दालनात झालेल्या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, मुख्याधिकारी निता अंधारे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी नागरीकांनी देखील आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडे शहरातील समस्या मांडल्या. आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांनी नगर पालिकेच्या उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सुचना देखील यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिल्या. नगरपालिकेतील पाणी पुरवठा व जलनिस्सारण विभाग, बांधकाम विभाग, अग्निशमन विभाग, अभिलेख विभाग, कर विभाग, लेखा परीक्षण विभाग, विद्युत विभाग, ▶▶पान २ वर

# कराडच्या जामिनावरील सुनावणी पुन्हा लांबली

## खंडणी प्रकरणात कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा वकिलाचा दावा

बीड, (प्रतिनिधी):-बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडच्या जामिनावरी सुनावणी कोर्टाने आज पुन्हा एकदा लांबणीवर टाकली. आज केज कोर्टापुढे ही सुनावणी होणार होती, पण कोर्टाने ऐनवेळी ती लांबणीवर टाकली. यामुळे जामिनाच्या प्रयत्नांत असणाऱ्या वाल्मीक कराडला जोरदार झटका बसला आहे. दरम्यान, बचाव पक्षाच्या वकिलांनी



खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा दावा केला आहे.

वाल्मीक कराडचे वकील अशोक कवडे कोर्टाच्या सुनावणीपूर्वी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, वाल्मीक कराडने खंडणी मागितल्याचा किंवा त्यांना खंडणी देण्यात आल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यांचा या गुन्ह्याशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नाही. पण माध्यमांच्या दबावामुळे नाहक त्यांना या प्रकरणी गोवण्यात आले आहे. वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यात १४ जानेवारी रोजी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर आम्ही तत्काळ जामिनासाठी याचिका दाखल केली. त्यावर कोर्टाने सरकारी पक्ष व तपासी अधिकाऱ्यांचे उत्तर मागितले. सरकारी पक्षाने आपले उत्तर दाखल केले आहे. या प्रकरणी १८ जानेवारी रोजी सुनावणी होणार होती. मात्र माझी प्रकृती ठीक नसल्यामुळे ही सुनावणी आज सोमवारी होणार होती. हे प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर चालणार आहे. या प्रकरणी न्यायालयात जोरदार युक्तिवाद होईल. न्यायालय आमची ▶▶पान २ वर

# न्यायालयीन चौकशीच्या मुख्यालयाचे ठिकाण हलविले

बीड, (प्रतिनिधी):-केज तालुक्यातील मस्साजोगमधील दिवंगत संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीआयडी, एसआयटीची स्थापना केल्यानंतर न्यायालयीन समिती ही गठीत केली होती. या समितीचा कारभार बीडमधून चालणार होता. मुख्यालयाचे ठिकाण आधी बीड येथे निश्चित करण्यात आले होते. मात्र आता उपसचिव हेमंत महाजन यांनी न्यायालयीन चौकशीचे मुख्यालय हे मुंबई येथे राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. याबाबतचा शासन निर्णय समोर आला आहे. मस्साजोगमधील दिवंगत संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात न्यायालयीन समिती गठीत करण्यात आली. या समितीचे प्रमुख म्हणून मुंबईच्या ▶▶पान २ वर

# धनंजय मुंडे राजीनामा देत नसतील तर हकालपट्टी करा

## ठाकरेंचा गुवाहाटी रीटर्न आमदार सभेत कडाडला

अकोला, (वृत्तसेवा) :- मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग स्पष्ट झाल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा घ्यावा, या मागणीने जोर धरला आहे. राज्यभर हत्येच्या निषेधात मोर्चे निघत आहे.अकोला जिल्ह्यात संतोष देशमुख व यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी, यासाठी भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी शिवसेनेतील फुटीच्या वेळी एकनाथ शिंदे यांच्याबरोबर गेलेले आणि नंतर गुवाहाटीहून (आसाम) परत आलेले ठाकरे गटाचे शिलेदार व बाळापूरचे आमदार नितीन देशमुख यांनी धनंजय ▶▶पान २ वर

# आधी मारला गावरान चिकन हंडीवर ताव, मग शिजला सरपंचाच्या हत्येचा कट

## देशमुखांच्या हत्येचं ढाबा कनेक्शन



### ■ अधिकाऱ्यांनी सीसीटीव्ही ताब्यात घेतले

हॉटेलचे मालक म्हणाले, ८ डिसेंबरला आरोपी आले होते. दोन गावरान चिकन हंडी ऑर्डर केली आणि जेवण करून ते गेले. सहा ते सात जण होते.अर्धा ते पाऊण तास ते हॉटेलमध्ये थांबले होते. आम्ही तपास अधिकाऱ्यांना हॉटेलचे सीसीटीव्ही देखील दिले आहे.

बीड, (प्रतिनिधी):-जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावच्या सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येला जवळपास दीड महिन्याचा कालावधी उलटून गेला आहे हत्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तसेच सीआयडी देखील या प्रकरणाचा तपास करत आहे. या प्रकरणात दररोज नवे खुलासे होत आहे. दरम्यान, या प्रकरणात आणखी एक अपडेट समोर आली आहे.संतोष देशमुखांच्या हत्येचा कट हा एका हॉटेलमध्ये बसून रचल्याची माहिती समोर आली आहे. राज्यभर गाजत असलेल्या सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचां कट सुदर्शन घुले आणि त्याच्या टोळीने एका हॉटेल मध्ये बसून रचला. यावेळी गावरान चिकनची ऑर्डर दिली होती. तर पाच ते सहा जण जेवायला होते असं हॉटेल मालकांनी सांगितलं..ज्या हॉटेलमध्ये बसून हत्येचा रचला. ते हॉटेल केज - मांजरसुंबा राष्ट्रीय महा मार्गावरील नांदूर फाटा येथील तिरंगा हॉटेलमध्ये हत्येचा कट रचण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# दिनेश वाघमारे राज्याचे नवीन निवडणूक आयुक्त

मुंबई, (वृत्तसेवा) :- जेष्ठ सनदी अधिकारी दिनेश वाघमारे यांची राज्याचे नवीन निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या नावाची शिफारस राज्यपालांकडे केल्यानंतर राज्यपालांनी त्यावर शिक्कामोर्तब केलं आहे. राज्यातील महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी नवीन निवडणूक आयुक्तांवर असणार आहे. दिनेश वाघमारे हे सचिव दर्जाचे अधिकारी आहेत. मंत्रिपरिषदेने नव्या निवडणूक आयुक्तांची निवड करण्याचे सर्वाधिकार हे मुख्यमंत्र्यांना दिले होते. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी दिनेश



वाघमारे यांच्या नावाची शिफारस केली होती. त्यानुसार राज्यपालांची दिनेश वाघमारेंच्या नावाला मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर राज्य सरकारच्या वतीने वाघमारेंच्या नियुक्तीचा एक आदेश जाहीर करण्यात आला आहे. दिनेश वाघमारे हे पुढच्या पाच वर्षांसाठी राज्याचे निवडणूक आयुक्त असतील. त्यानंतर त्यांना पुनर्नियुक्ती मिळणार नाही. भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३-के व अनुच्छेद ▶▶पान २ वर






# चक्क दारूच्या रिकाम्या बाटल्यात पाण्याचे नमुणे

## आरोग्य विभागाचा अजब कारभार



बीड, (प्रतिनिधी):-बीड जिल्हा रुग्णालय आवारातील मुख्य अणु जीवशास्त्र जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाणी तपासणीसाठी चक्क दारुच्या रिकाम्या बाटल्यांत पाण्याचे नमुने घेण्याचा गंभीर प्रकार आढळून आला असुन काचेच्या बाटल्याची गरज असेल तर किमान प्रयोगशाळा प्रशासनाने त्या बाटल्याच्या झाकणावरील टँगो, बॉबी, संत्रा असे दारूचे लेबल तरी काढून वापरण्याची गरज आहे.त्यामुळे दारूच्या रिकाम्या बाटल्या योग्य रित्या निर्जंतुकीकरण करून वापरात घेतात की नाही? असा प्रश्न पडला असुन एकंदरीतच पाणी तपासणीवर प्रश्नचिन्ह ▶▶पान २ वर

### ...मग रिकाम्या दारूच्या बाटल्यात पाणी तपासणी का?-डॉ.गणेश ढवळे

प्राथमिक आरोग्यकेंद्र, खासगी शाळा, तसेच शहरातील हॉटेल व इतर सार्वजनिक ठिकाणी वापरात असलेले पाणीनमुणे या प्रयोगशाळेत तपासणीसाठी येतात. पाणीतपासणीवर प्रयोगशाळा प्रशासन लाखो रुपये खर्च करत असावे तसेच या पाणीनमुणे तपासणीवर लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्या दृष्टीकोनातून उपसंचालक पुणे यांनी पाणी तपासणीसाठी काचेच्या बाटल्या उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. परंतु प्रयोगशाळा प्रशासन या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करताना दिसत असून अशाप्रकारे देशीदारूच्या रिकाम्या बाटल्यात पाणीनमुणे तपासणीसाठी घेणे योग्य आहे का? याचा प्रयोगशाळा प्रशासनाने विचार करण्याची गरज आहे.




# ट्रम्पोदयाचे टरकणे



एखाद्याच्या केवळ सत्तारोहणामुळे जगभरात इतकी हुरहुर, साशंकता, संभ्रम आणि संशय भावना दाटून येत असेल तर ही बाब त्या व्यक्तीसाठी अभिमानास्पद की लज्जास्पद याची चर्चा आता करणे निरर्थक. अमेरिकेचे वे४७ अध्यक्ष म्हणून आज, २० जानेवारीस, डोनाल्ड ट्रम्प शपथ घेत असताना 'आता पुढे काय' या प्रश्नचिन्हाच्या काळ्या सावलीचा झाकोळ सर्वत्र पसरलेला दिसतो. ट्रम्प यांचे व्यक्तिमत्त्व असे की ते याचा अभिमान बाळगतील. कोणताही आणि कोणत्याही देशातील नेता जनतेच्या मनात आश्वस्ततेची भावना निर्माण करण्याऐवजी भीती आणि दहशत यांस जन्म देत असेल आणि वर त्याचा अभिमान बाळगत असेल तर ते त्या समाजाचे अधोगती निदर्शक ठरते. ही अधोगती अमेरिकी समाज आता अनुभवेल. लोकशाहीत जनतेचा कौल शिरसावंद्या मानायला हवा, हे मान्य. त्यामुळे या अध्यक्षीय निवडणुकीचा निकाल सर्वांनी गोड मानून घ्यायला हवा, हेही मान्य. तथापि आधीच्या निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर तो कौल नाकारणारा, हिंसक आंदोलन करणारा आणि त्यासाठी न्यायालयात दोषी ठरलेला नेता ज्यावेळी पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरतो तेव्हा त्याच्या लोकशाही निष्ठा संशयास्पद असतात, हे अमान्य करता येत नाही. हे ट्रम्प यांच्याबाबत घडले. आता पुढील चार वर्षे समस्त विश्वास त्यांचे असणे सहन करावे लागणार आहे. हे सहन करणे सुरू होण्यापूर्वीच पुढे काय वाढून ठेवलेले आहे याची चुणूक ट्रम्प गेले दोन महिने दाखवत आहेत. अमेरिकी बाजारात येणाऱ्या परदेशी वस्तूंवर दणदणीत आयातशुल्क आकारण्यापासून त्या देशात स्थलांतरित होऊ इच्छिणाऱ्यांवर सणसणीत निर्बंध लादण्यापर्यंत ट्रम्प यांनी आपली धोरणदिशा स्पष्ट केलेली आहे. त्या बरोबरीने ट्रम्प यांची नेतृत्वक्षमता तीन मुद्द्यांवर जोखली जाईल. इस्रायल-पॅलेस्टाइन संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध आणि अमेरिकेच्या महासत्तापदास आव्हान देणारा चीन हे तीन मुद्दे ट्रम्प यांचे नेतृत्वकौशल्य जोखतील. यातील पहिल्याबाबत ट्रम्प यांनी स्वत:ची शेखी आधीच मिरवलेली आहे. ''मी केवळ निवडून आलो या घटनेनेच इस्रायल-पॅलेस्टाइन संघर्ष मिटण्याची सुरुवात झाली'' अशा अर्थाचे केवळ ट्रम्प-मुखातून निघू शकते असे विधान त्यांनी केले. आता या संघर्षाचे निखारे विझलेले राहतील याची खबरदारी घेण्यात त्यांची कसोटी लागेल. युक्रेन युद्धाबाबत ट्रम्प यांचा सल्ला रशियाचे अध्यक्ष पुतिन किती ऐकतील याचा अंदाज अद्याप कोणाला नाही. मुळात ट्रम्प हे पुतिन यांस या मुद्द्यावर रोखू इच्छितात किंवा काय, हा खरा प्रश्न. याआधी पुतिन यांनी ट्रम्प यांचे पाणी जोखलेले आहे आणि ट्रम्प यांच्या अध्यक्षपूर्व रशिया दौऱ्यात त्यांना कोणकोणत्या गोष्टी पुतिन यांनी 'पुरवल्या' याचीही चर्चा झालेली आहे. दुसरे असे की २०१६च्या अध्यक्षीय निवडणुकांत पुतिन यांची ढवळाढवळही सर्वश्रुत आहे. त्यामुळे ते ट्रम्प यांस कितपत भीक घालतील हा प्रश्न. तोच चीनच्या क्षी जिनपिंग यांसही लागू होतो. चीन आणि जिनपिंग हे विचित्र रसायन आहे. त्यांना केवळ चीन महासत्ता होण्यात रस नाही. त्यांचा भर आहे तो जगाची आहे ती घडी विस्कटून टाकण्यात. त्यासाठी चीनने स्वत:च्या अर्थव्यवस्थेचा आकार इतका वाढवला की जगातील अनेक देशांच्या बाजारपेठांतून आज चिनी उत्पादने ओसंडून वाहताना दिसतात. त्यामुळे अन्य देशांची- त्यातही अमेरिकेची अधिक- चीनशी व्यापार-तूट अचाट वाढलेली आहे. ती भरून काढण्यासाठी ट्रम्प हे चिनी उत्पादनांची आयात महाग करू इच्छितात. म्हणजे अमेरिकेच्या बाजारातील चिनी उत्पादनांवर भरभक्कम आयातशुल्क लावणे. ही अशी आकारणी एकतर्फी होणार नाही, हे उघड आहे. तसे झाल्यास प्रत्युत्तरात चीनही तशाच स्वरूपाचे काही उपाय योजेल. आज अमेरिकेचा सर्वात मोठा कर्जपुरवठादार चीन आहे. म्हणजे चिनी सरकारने डॉलर प्रचंड प्रमाणावर खरेदी केलेला आहे वा अमेरिकी रोख्यांत लक्षणीय गुंतवणूक केलेली आहे. चीन याचा वापर अस्त्र म्हणून करणारच नाही, असे नाही. तसे झाल्यास जग एका नव्या व्यापारयुद्धास सामोरे जाईल.

हे वास्तवाचे ट्रम्प यांच्या दृष्टिकोनातून विवेचन. त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे आपल्या नजरेतून ट्रम्पोदयाकडे पाहणे. गुरपतवंत पन्नू या खलिस्तानवादी दहशतवाद्याच्या हत्याकटाबाबत आपल्या बदललेल्या भूमिकेचे 'श्रेय' या ट्रम्पोदयाकडे जाते. या पन्नू याच्या हत्याकटात एकही भारतीय गुंतलेला नाही, ही आपली आतापर्यंतची छातीठोक भूमिका. हे पन्नू प्रकरण कॅनडावासी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर समोर आले. निज्जर हत्येसाठी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी भारतास जाहीर बोल लावले. त्यानंतर काही महिन्यांतच अमेरिकेच्या न्याय खात्याने निज्जर हत्याकटाबाबत वाच्यता केली आणि त्यास मारण्याचा प्रयत्न भारतीयाकडून झाल्याचे सूचित केले. त्यासाठी अमेरिकेने कोणा निखिल गुप्ता यांचे नाव पुढे केले. या निखिल गुप्तास २०२३च्या जून महिन्यात प्राग येथे अटक करून २०२४च्या जून महिन्यात अमेरिकेच्या हाती सुपूर्द केले गेले. अमेरिकी व्यवस्थेने इतके सारे तपशील उघड केल्याने आपली चांगलीच कोंडी झाली. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, जर्मनी आदी देश एकमेकांत हेरगिरीची देवाण-घेवाण करतात. तसा करार आहे. त्यानुसार निज्जर हत्येचा पुरावा जमा करण्यात अमेरिकी यंत्रणाही सहभागी होत्या. त्यामुळे या मुद्द्यावर कॅनडास अमेरिकेपासून दूर करण्याचा आपला प्रयत्न फसला. त्यानंतर उघड झाला पन्नू हत्याकट. त्यातही अमेरिकी यंत्रणांनी थेट भारत सरकारला बोल लावून आपली चांगलीच अडचण केली. तेव्हा आम्ही असे काहीही केलेले नाही असे आपणास सांगावे लागले. पण ही छातीठोक अस्थानी ठरली आणि अमेरिकेने या मुद्द्यावर एक पाऊलही मागे घेण्यास नकार दिल्यानंतर 'उच्चस्तरीय चौकशी'ची घोषणाही आपणास करावी लागली. या 'उच्चस्तरीय चौकशी'चा अहवाल नुकताच सादर झाला. त्यात पन्नू हत्याकटात कोणा भारतीयाचा हात असू शकतो अशी 'कबुली' आपणास द्यावी लागली. ट्रम्प यांच्या राज्यारोहणास काही दिवस राहिलेले असताना ही कबुली आपणास द्यावी लागणे हा योगायोग खचित नाही. पन्नू हत्याकटातील हा भारतीय 'गुन्हेगारी' पार्श्वभूमीचा असल्याचे या 'उच्चस्तरीय' समितीस आढळले. तथापि हा भारतीय कोण हे समितीने उघड केलेले नाही. तथापि त्याच्यावर कारवाई केली जावी, अशीही शिफारस ही 'उच्चस्तरीय' समिती करते. म्हणजे ज्या कटात हात असल्याचे आपणास अजिबात मान्य नव्हते आणि तसे बाणेदारपणे आपण सांगितले होते ती आपली भूमिका पूर्ण बदलली असून आता कटात सहभाग असल्याचे मान्य करण्यापासून कारवाईच्या शिफारशीपर्यंत आपली मजल गेली आहे. या बदलाबद्दल अमेरिकेचे मावळते राजदूत एरिक गारिसेट्टी यांनी भारत सरकारचे 'अभिनंदन' केले आणि पुढे जात 'आम्हाला हवे तसे घडत' असल्याचे सांगत आपल्या मुत्सद्देगिरीच्या जखमेवर मीठ चोळले. ते चोळताना यात अधिक कारवाईची अपेक्षाही अमेरिका व्यक्त करते. याचे 'श्रेय' निर्विवाद ट्रम्प यांचे. हा गृहस्थ काहीही बोलू शकतो आणि त्याचबरोबर काहीही करू शकतो. त्यामुळे न जाणो उद्या याप्रकरणी काही थेट भाष्य त्याने केले तर आपली भलतीच अडचण व्हायची. ती टाळण्यासाठी आपण या हत्याकटात भारतीयाच्या सहभागाची कबुली दिली, हे निर्विवाद. अशा तऱ्हेने ट्रम्पोदयाने सारे जगच टरकलेल्या अवस्थेत असून जागतिकीकरण, व्यापार यासह अनेक मुद्द्यांवर हे महाशय काय भूमिका घेतात याकडे सारे जग श्वास रोखून पाहात राहील.

# राज्यातील सर्वच गड किल्ल्यांवरील अतिक्रमण हटवणार; फडणवीसांनी दिली डेडलाईन

मुंबई, (वृत्तसेवा):- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. ३१ मे पर्यंत राज्यातील सर्व गड किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवण्यात येणार आहेत. गड किल्ल्यांवरील अतिक्रमणाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. अतिक्रमण हटवण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. ३१ जानेवारीपर्यंत सरकारने जिल्हाधिकाऱ्यांकडून अतिक्रमणांची यादी मागवली आहे. १ फेब्रुवारी ते ३१ मे पर्यंत टप्प्याटप्प्याने अतिक्रमण हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून दक्षता समितीची नेमणूक देखील करण्यात आली आहे. राज्यात केंद्र संरक्षित ४७ किल्ले आणि राज्य संरक्षित ६२ किल्ले आहेत. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय समिती गठीत करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. राज्यातील गडकिल्ल्यांसंदर्भात सरकारने मोठा निर्णय घेतलाय. अतिक्रमणामुळे गुदमणारे किल्ले आता मोकळा श्वास घेणार आहेत. राज्य सरकार गडकिल्ल्यांच्या सौंदर्याचे जतन करण्याचे काम करणार आहे. यासाठी किल्ल्यांवरील अतिक्रमण हटवण्यात येणार आहेत. तसेच पुढे भविष्यात अतिक्रमण होऊ नये, यासाठी सरकारने दक्षता समितीची देखील स्थापना केली आहे. विशाळगडावर झालेल्या अतिक्रमणानंतर गड किल्ल्यांच्या संवर्धनाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. विशाळगडाप्रमाणे राज्यातील अनेक गड किल्ले देखील अतिक्रमित असल्याची बाब समोर आल्यानंतर सरकारने त्याबाबत काहीतरी ठोस निर्णय घ्यावा, अशी प्रकारची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून केली जात होती. त्यापार्श्वभुमीवर सरकारने मोठे निर्णय घेतला आहे. राज्यातील ४७ किल्ल्यांना केंद्र स्वरक्षित आहेत. तर राज्य सरकारच्या संरक्षित गडकिल्ल्यांची संख्या ६२आहे. तर असंरक्षित किल्ल्यांची संख्या ३०० च्या दरम्यान आहे. या किल्ल्यांवरील सौंदर्य जतन करण्याचे काम केले जाणार आहे. त्याअनुषंगाने हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी १ फेब्रुवारी ते ३१ मे पर्यंत टप्प्याटप्प्याने अतिक्रमण हटवण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार किल्ल्यांच्या संरक्षणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. त्यामुळं आता ज्या ज्या ठिकाणी गड किल्ल्यांवर अतिक्रमणे असतील त्याठिकाणची अतिक्रमणे निघणार आहेत.



# धनंजय मुंडे म्हणतात षडयंत्र तर मग ते कोणी रचलं? भुजबळांचा नेमका रोख कोणाकडे?

नाशिक, (वृत्तसेवा) :- पहाटेच्या शपथविधीच्या वेळी मी अजितदादांना सांगत होतो की, तुम्ही भाजपसोबत जाऊ नका, हे षडयंत्र आहे, असे खळबळजनक वक्तव्य राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. धनंजय मुंडेंच्या या गौप्य स्फोटानंतर माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी सवाल उपस्थित केला आहे. षड्यंत्र होतं तर कुणी रचलं असा प्रश्न उपस्थित केला आहे. छगन भुजबळ म्हणाले, मी भाषण ऐकलं. षड्यंत्र होतं तर कुणी रचलं? उद्धव ठाकरे, काँग्रेसने रचलं नसेल. राष्ट्रवादी किंवा भाजपच्या लोकांनी रचल का? काँग्रेस आणि पवार साहेब यांच्यात वाद झाला होता. पवार साहेब निघून गेले. अजित दादा एका मिटिंगला नव्हते नंतर अजितदादा टीव्हीवर दिसले. मी पवार साहेबांकडे गेलो होतो. कामाला लागू सांगितलं. आम्हाला काही कल्पना नव्हती. इकडे तिकडे गेलेले आमदार शोधायला सुरुवात केली. मी स्वतः अजित दादांकडे गेलो होतो असं करू नका म्हणून, पवार साहेबांकडे या असं मी सांगितले. आमच्या पक्षाची जी मिटिंग झाली त्यात मी स्वतः ठराव मांडला .चूक झाली असेल तर जाऊद्या सांगितले. उपमुख्यमंत्री करा हे सुद्धा मी सांगितले . माझ्याबद्दल काही लोकांना राग सुद्धा आला. काल त्यांनी सांगितले त्याचा रोख कुणाकडे होता हे त्यांना माहिती आहे. नाशिक आणि रायगड पालकमंत्रिपद स्थगितीवर बोलताना भुजबळ म्हणाले, मी मंत्री नाही काय चाललंय, कोण काय मागतं माहिती नाही .सगळ्यांनाच मिळेल असे नाही. अडचण आली असेल म्हणून स्टे दिला असेल. मुख्यमंत्री उद्योगपतींच्या कार्यक्रमाला गेले आहे नंतर ते आल्यावर चर्चा करून मार्ग काढतील. घरपोच डिझेलवर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, भारत सरकारचा स्टार्टअप इंडिया संकल्प आहे. त्यातील हा एक उपक्रम आहे.घरपोच डिझेल पोहचवणे, दोन मित्रांनी हे सुरू केले. त्यांनी टँकर घेतला, भारत सरकारने सबसिडी दिली. मोठमोठ्या ठिकाणी कामे सुरू आहे यांना फोन आला की डिझेल मिळेल. जशी जेवणाची ऑर्डर देतात आणि जेवण मिळते तशी ही योजना आहे. ॲडव्हान्स बुकिंग सुद्धा करता येणार आहे. पेट्रोल पंपावर जाण्याची गरज नाही. ताबडतोब सेवा मिळणार आहे त्यांनी मोबाईल नंबर दिला आहे.



जाहिरात करा म्हणून त्यांनी सांगितले आहे. वेळ वाचणार आहे, पाहिजे त्या वेळेला मिळणार आहे . केंद्राच्या योजनेचा त्यांनी फायदा घेतला.

पान १ वरून

## एका पराठ्यामुळे...

अवघ्या काही तासांतच जंगलाच्या झुडुपातून त्याच्या मुसक्या आवळल्या. प्राथमिक चौकशीनंतर आरोपीने सांगितले की, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे बातम्यांमध्ये माझा फोटो प्रसिद्ध झाल्यानंतर मी घाबरलो होतो. त्यामुळे मी ठाण्यातील ज्या बारमध्ये काम करत होतो तिथे गेलो. ठाण्यातील परिसर माझ्या परिचयाचा होता.'' सैफवर हल्ला झाल्याचं समजताच मुंबई गुन्हे शाखेने आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजनुसार तो आधी वांद्रे रेल्वे स्थानकात गेला, तिथून तो दादर येथे उतरला. दादरच्या एका दुकानातून त्याने मोबाईल कव्हरही खरेदी केले. पण त्याने इथं रोख रक्कम भरली. तिथून तो कबूतरखाना आणि नंतर वरळीला गेला. असं सीसीटीव्हीतून पोलिसांना समजलं, अशी माहिती सूत्रांनी इंडियन एक्स्प्रेसला दिली. वरळी परिसरातील फुटेज तपासल्यानंतर तो सेंच्युरी मिलजवळील एका स्टॉलवर काही काळ रेंगाळत असल्याचं दिसले. फुटेजमध्ये तो स्टॉल चालवणाऱ्या व्यक्तीशी गप्पा मारतानाही दिसला. त्यानुसार, गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ वरळीत धाव घेऊन त्या स्टॉल मालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्याच्याकडून काहीतरी पुरावा मिळेल, या आशेने पोलिसांनी तिथे सात पथके तैनात केली. स्टॉलचा मालक नवीन एक्का या नावाने ओळखला जातो. पोलिसांना या एक्काचा जनता कॉलनीतील जयहिंद मित्र मंडळ येथील घराचा पत्ता सापडला. ते तिथे पोहोचले असता तो तिथे सापडला नाही. एक्का तिथे पाच-सहा कामगारांसह भाड्याने राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे पोलिसांनी तेथील खोली मालकाचा मोबाईल क्रमांक मिळवून त्यांच्याशी संपर्क साधला. एक्का नावाचा भाडेकरू तिथे राहत असल्याचं मालकाने सांगितलं, पण ते आरोपीला ओळखू शकले नाहीत, असंही इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तात नमूद आहे. खोली मालकाच्या मुलाने एक्काचा मोबाईल नंबर पोलिसांना दिला. त्यानुसार, पोलिसांनी एक्काला फोन करून त्याची चौकशी केली. या चौकशीतून त्याने सांगितलं की मोहम्मदने पराठा आणि पाण्याच्या बाटलीसाठी युपीआय पेमेंट केले होते. त्या पेमेंटमुळे पोलिसांना मोहम्मदचा मोबाईल नंबर मिळाला.

पान १ वरून

## आ.संदीप क्षीरसागरांनी...

संगणक विभाग आदींसह नगररचना विभागाचा आढावाही आ.क्षीरसागर यांनी घेतला. यासोबतच गेल्या काही वर्षांपासून शहरातील मालमत्तांचा रिव्हीजन सर्व्हे झालेला नाही. हा सर्व्हे दर चार वर्षांनी केल्यास उत्पन्न वाढवता येईल. बीओटी तत्वावरील काही इमारती धुळखात पडलेल्या आहेत. त्या वापरात आणून त्यातूनही उत्पन्न वाढविता येऊ शकते. अशा उपाययोजना यावेळी सुचविण्यात आल्या. बीड शहरात एकाही ठिकाणी नगर पालिकेची पार्किंग नाही,त्यामुळे काही जागा ज्या पडीक आहेत, किंवा वापरात नाहीत अशा ठिकाणी व्यवसायीक गाळे आणि पार्किंगची सुविधा उपलब्ध केल्यास त्यातूनही उत्पन्न वाढवता येईल अशा देखील सुचना यावेळी करण्यात आल्या. नाविण्यपुर्ण योजनेतून नगर पालिकेला निधी मिळावा त्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्याच्या सुचना आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांनी दिल्या. शहरात ठिकठिकाणी लोखंडी कचरा कुंड्या ठेवण्यात आलेल्या आहेत. मात्र त्या जाग्यावरच सडून चालल्या आहेत. त्याच्या खरेदीच्या अनुषंगानेही कार्यवाही करावी, स्वच्छता, पाणी पुरवठा, रस्ते, नाल्या, वीज हे मुलभूत प्रश्न तात्काळ मार्गी लावा त्यात हयगय करू नका लोकांच्या तक्रारी प्राधान्याने सोडवा अशा सक्त सुचना आ.संदीपभैय्या क्षीरसागर यांनी अधिकार्यांना दिल्या. * बीड शहरातील जुन्या भाजी मंडईत नगर पालिकेने मच्छीमार्केटसाठी इमारत बांधलेली आहे. रेडिरेकनर प्रमाणे त्याचे भाडे निश्‍चित करण्यात आले आहे. भाडे जास्त असल्यामुळे त्या ठिकाणी कोणताच व्यवसायीक पुढे येत नाही त्यामुळे नाममात्र दरात तेथील गाळे व्यवसायीकांना दिल्यास नगर पालिकेचे उत्पन्न वाढू शकते अशी सुचना यावेळी अधिकार्यांना करण्यात आली. त्याचबरोबर जुन्या भाजी मंडईत बीओटी तत्वावरील आणखी कॉम्पलेक्स बांधता येतील का ? या दृष्टीनेही नगर पालिकेने प्रयत्न करावेत. जेणेकरून पालिकेच्या उत्पन्नात भरत पडेल अशीही चर्चा या बैठकीत करण्यात आली.

## कराडच्या जामिनावरील...

बाजू ऐकून घेईल. या दोन – तीन बाबी विचारात घेऊन आम्हाला जामीन मिळेल असा अंदाज आहे. आमच्या पक्षकाराचा न्यायालयावर विश्वास

पान १ वरून

आहे. त्यांच्यावरील १४ गुन्ह्यांपैकी ११ ते १२ गुन्ह्यातून त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे. एक ते दोन गुन्हे राजकीय आंदोलनाच्या संदर्भात परळी न्यायालयात प्रलंबित आहेत. ही यादी वाल्मीक कराड यांनी स्वतःहून दाखल केली आहे, असेही वकील अशोक कवडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. बचाव पक्षाच्या वकिलांनी यावेळी संतोष देशमुख हत्याकांड व खंडणीच्या गुन्ह्याचा वाल्मीक कराडशी संबंध आहे किंवा नाही याचा खुलासा तपास अधिकारी करतील असेही सांगितले. संतोष देशमुख हत्या व खंडणीच्या गुन्ह्याशी वाल्मिक कराड यांचे कनेक्शन आहे की नाही? या गुन्ह्यासंदर्भात त्यांच्याकडे तसे पुरावे आहेत का नाही? हे तपासी अधिकारी कोर्टसमोर स्पष्ट करतील, असे ते म्हणाले. उल्लेखनीय बाब म्हणजे वाल्मीक कराडने खंडणी प्रकरणात गत ३१ डिसेंबर रोजी पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पण केले होते. त्यानंतर आता त्याच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे त्याला जामीन मिळणे अवघड असल्याचे सांगितले जात आहे. पण प्रत्यक्ष न्यायालयात काय होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## चक्क दारूच्या रिकाम्या...

निर्माण झाले असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, सचिव स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई, उपसंचालक आरोग्य सेवा राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे यांना केली आहे. बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात पाठिमागील बाजूस असलेल्या पाणीतपासणी प्रयोगशाळेत चक्क देशीदारूच्या रिकाम्या बाटल्या पाण्याचे नमुणे ठेवल्याचे दिसून आले. सदरील बाटल्या योग्यरित्या स्वच्छ करून प्रयोगशाळा प्रशासन वापरात घेत आहे का? असा प्रश्न निर्माण झाला असून त्या बाटल्याच्या झाकणावर टँगो, बॉबी, संत्रा

पान १ वरून

लिहिलेले लेबल तरी काढून प्रयोगशाळा प्रशासनाने अशा बाटल्यांचा वापर करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. पाणी तपासणी प्रयोगशाळेतून जिल्ह्याच्या आरोग्याचा प्रश्न अवलंबून असतो. पाणी योग्य आहे की अयोग्य आहे या अहवालावर बीडचे नागरिक व ग्रामस्थ पाण्याचा वापर करतात. जर अशाप्रकारे दारूच्या बाटल्यात पाणी नमुणे तपासणी होत असेल तर ही बाब गंभीर आहे. प्रयोगशाळा प्रशासन या दारूच्या रिकाम्या बाटल्या योग्यरित्या स्वच्छ करत असतील का? असाही प्रश्न सर्वसामान्यांना पडला असून दारूचे लेबल पाहून पाण्याच्या तपासणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याची जिल्हाधिकार्यांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

## धनंजय मुंडे राजीनामा...

मुंडेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा अशी मागणी केली आहे. तसेच धनंजय मुंडे हे वाल्मीक कराडला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा थेट आरोप देखील देशमुख यांनी केला आहे. ते अकोल्यात बोलत होते. नितीन देशमुख म्हणाले, बीड जिल्ह्यातील घटना अतिशय दुर्दैवी आहे. आजपर्यंत अशी घटना आपल्या देशात कधीच घडली नाही. वाल्मिकी टोळी ही राक्षसी प्रवृत्तीची टोळी आहे. आता संपूर्ण महाराष्ट्र संशयाच्या भोवऱ्यात आहे, कारण धनंजय मुंडेंनी माध्यमांसमोर येऊन सांगितले होते की वाल्मिकी माझा मित्र आहे. अतिशय जवळचा आहे. धनंजय मुंडेंचा वाल्मिकी मित्र आणि वाल्मिक टोळीचा मित्र आहे. महाभारताप्रमाणे मित्र मित्राला वाचतो की काय? अशी परिस्थिती सध्या राज्यात आहे. धनंजय मुंडे हे वाल्मीक कराडला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. विदर्भात मोर्चे निघत आहे. देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री आहेत ते काय निर्णय घेणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मंत्रिमंडळातून एखाद्या मंत्र्याची हकालपट्टी करण्याचे अधिकार हे मुख्यमंत्र्यांचे असतात. ही एक टोळी आहे.देवेंद्र फडणवीसांना विनंती आहे की, महाराष्ट्राला तुमच्याकडून अपेक्षा आहे. तुम्ही धनंजय मुंडेला मंत्रिमंडळात ठेवता की हकालपट्टी करता याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. ते स्वत:हून राजीनामा देणार नाही त्यामुळे तुम्हीच त्यांची हकालपट्टी करा. धनंजय मुंडेंना जर वाटत असेल तर मित्राने चुकीचे काम केलं असं वाटत असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा. तुमचा मित्र पाप करतो, घोटाळे करतो, राक्षसी कृत्य करतो तरीसुद्धा तुम्ही राजीनामा देत नाही, असेही नितीन देशमुख म्हणाले.

## दिनेश वाघमारे...

२४३-झेडए आणि महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ मधील तरतुदीस अनुसरुन महाराष्ट्राचे राज्यपाल, श्री. दिनेश टी. वाघमारे यांची, दिनांक २० जानेवारी, २०२५ पासून किंवा त्यानंतर ते ज्या तारखेला कार्यालयात आपल्या पदाचा कार्यभार घेतील, त्या तारखेपासून राज्य निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक करीत आहेत. श्री. दिनेश टी. वाघमारे हे सदर पदाचा कार्यभार स्वीकारतील त्या दिनांकापासून ५ वर्षांकरीता हे पद धारण करतील आणि ते पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाहीत. त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ह्या राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार असतील. राज्य निवडणूक आयुक्तांवर जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्राम पंचायती, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या मतदार याद्या तयार करण्याबाबतचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण करण्याची तसेच त्यांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राहील.

## न्यायालयीन चौकशीच्या...

उच्च न्यायालयातील निवृत्त न्या. एम. एल. तहलियानी यांची नियुक्ती करण्यात आली होती. तहलियानी यांच्या समितीचे कार्यालय बीड येथे राहिलं असे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र न्या.एम.एल. तहलियानी यांनी पत्राद्वारे सरकारकडे विनंती करत मुख्यालय मुंबई येथे करण्याची विनंती केली. त्यानुसार शासनाने सोमवारी हे नवीन आदेश काढले आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

CMYK



# 'उमेद'च्या सरस प्रदर्शनाचा समारोप

## बचतगटाच्या सरस प्रदर्शनामुळे, खाद्य आणि कला संस्कृतीला प्रोत्साहन मिळाले: सीईओ आदित्य जीवने

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणे अंतर्गत 'उमेद'च्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय जिल्हास्तरीय मिनी सरस प्रदर्शनामुळे सर्वांना आनंद मिळाला आहे. या प्रदर्शनामध्ये बचतगटांनी तयार केलेल्या विविध वस्तुआणि खाद्य संस्कृतीमुळे मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन ट्रांजिक्शन झाले. सरस प्रदर्शनाच्या माध्यमातून यशस्वी स्रोत मिळाला आहे. उमेदच्या जिल्हास्तरीय सरस प्रदर्शनात २३ लाख ८७ हजार रुपयांची विक्री झाली यामुळे मिनी सरस प्रदर्शन यशस्वी झाले आहे. यामुळे आनंदाची भावना



निर्माण झाली, असे प्रतिपादन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केले. याप्रसंगी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारीवआदित्य जीवने यांनी सांगितले की, सदरील सरस यशस्वी होण्यामागे केवळ या पाच दिवसातील महिलांची मेहनत नाही, तर वर्षातील ३६५ दिवस महिलांनी मेहनत घेतली आहे तेव्हा हे सर्व यशस्वीपणे या ठिकाणी पार पडले आहे. सरसमध्ये महिलांनी आणलेल्या अनेक उत्पादनाचे पॅकिंग व ब्रँडिंग अतिशय उत्कृष्ट पद्धतीचे होते तसेच उमेदच्या इतर उद्योजक महिलांनाही यापुढे उत्पादनाच्या पॅकेजिंग व ब्रँडिंग चे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच सर्व प्रदर्शनामध्ये डिजिटल ऑनलाइन पेमेंटचा वापर मोठ्या प्रमाणात केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी महिलांचे भरभरून कौतुक केले.

याप्रसंगी श्रीमती संगितादेवी पाटील यांनी प्रास्तविक भाषणात, जिल्हास्तरीय मिनी सरस प्रदर्शनास मोठा प्रतिसाद मिळाला असून यापुढे ३६५ दिवस काम करण्याची जबाबदारी वाढली आहे. मार्चपर्यंत सर्व नियोजन करून गावोगाव बैठका आणि दशसूत्री उजळणी, प्रशिक्षण आणि यापुढील शाश्वत उपजीविकेसाठी वाटचाल करण्यात येणार असल्याची माहिती दिली. यावेळी त्यांनी बचत गटाच्या प्रदर्शनास सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार मानले. बीड मिनी सरस प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतलेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी विविध विभाग प्रमुख नगरपरिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, अग्नीशमन विभाग, पोलीस प्रशासन इत्यादी बद्दल कृतज्ञता व्यक्त करून प्रदर्शनाची मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी केल्याबद्दल उपस्थित सर्व पत्रकारांचे बचतगटाच्या महिलांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन आभार व्यक्त केले. विस्तार अधिकारी वैभव जाधव यांनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा व्यवस्थापक शकील शेख यांनी केले. सुत्रसंचालन तालुका अभियान व्यवस्थापक श्रीमती रश्मी गोसावी यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हा व्यवस्थापक आशा पवार यांनी केले.

# एकाच दिवशी ७५००० बॉटल रक्त जमा करण्याचा संकल्प

## केमिस्ट असोसिएशन कडून देशभरात रक्तदान शिबिर

**माजलगाव । प्रतिनिधी**

केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशन च्या राष्ट्रीय शाखेकडून २४ जानेवारी रोजी देशभरात रक्तदान शिबिराचे आयोजन केले असून याचाच एक भाग म्हणून माजलगावं शहरातील जुना मोंढा येथील व्यापारी महासंघाच्या कार्यालयात २४ जानेवारी शुक्रवार रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजता हे रक्तदान शिबीर होणार आहे. केमिस्ट असोसिएशन चे राष्ट्रीय अध्यक्ष जगनाथ शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्त देशभरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त देशभरात एकाच दिवशी ७५०००



रक्ताच्या बॅग संकलित करण्याचा संकल्प केमिस्ट असोसिएशनचा आहे. माजलगाव केमिस्ट असोसिएशन चे पदाधिकारी यासाठी मेहनत घेत आहेत. माजलगाव शहरातूनही जास्तीत जास्त रक्त संकलित व्हावे यासाठी रक्तदात्यानी रक्तदान करावे असे आवाहन केमिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष विनोद शर्मा, श्रीनिवास टवानी, राधेश्याम जेथलिया, जयंत अकोलकर, सय्यद जावेद व इतर सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# करोडो रुपयाची बिले गुत्तेदाराने घशात घालत उमरी जल जीवन चे काम केलं ठप्प

## जालिंदर डावकर ला कारवाईची नोटीस मार्च पर्यंत काम पूर्ण करा नसता कारवाईस सामोरे जा

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील उमरी येथे जलजीवन पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा दोन वर्षांपूर्वी शुभारंभ करण्यात आला होता. त्यानंतर कामाला सुरुवात केली मात्र कामाचा दर्जा अतिशय निकृष्ट होता. निकृष्ट करत असलेले काम आज पर्यंत पूर्णत्वास न करता करोडो रुपयाचे बिले गुत्तेदारीने घशात घातली आहे त. याबाबत अनेक तक्रारी व काम ठप्प आसल्या संबंधी कंपनीने उमरी येथील गुत्तेदार जालिंदर डावकर यांना नोटीस बजावत मार्च पर्यंत काम करण्याचे आदेश दिले आहेत. नसता कारवाईस सामोरे जा अशी तंबी दिली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व दररोज पाणी मिळावे म्हणून केंद्र सरकारने हर घर जल ही योजना जलशक्ती मंत्रालयाने २०१९ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत केन्द्र शासनाने अत्यंत महत्वकांक्षी कार्यक्रम राबवला. जिल्ह्यातील अनेक गावासाठी करोडो रुपयांचा निधी आला होता. यामध्ये माजलगाव तालुक्यातील उमरी येथील जलजीवन योजनेसाठी तब्बल ४ कोटी रुपयाचा निधी मिळाला होता. या कामाची सुरुवात एप्रिल २०२३ मध्ये झाली होती काम सुरू होऊन दोन वर्षे होत आहे तरीही संबंधित गुत्तेदाराला काम पूर्ण करता आले नाही निकृष्ट दर्जाचे अर्धवट काम करून १ कोटी ४३ लाख ७४ हजार २९४ रुपयाचा निधी घशात घातला आहे. या कामाच्या अनेक तक्रारी ग्रामस्थांनी करूनही संबंधित गुत्तेदार अधिकारी ,पुढार्यांच्या आशीर्वादाने काम बोगस करण्याचा सपाटा लावला होता. संबंधित गुत्तेदाराने मागील आनेक महिन्यापासून अर्धवट काम सोडले आहे. आता उन्हाळ्याला सुरुवात झाली असून पाणी प्रश्न गंभीर होणार आहे.

### कामासह जीएसटी बिलेही बोगस

**उमरी जलजीवन चे काम अतिशय निकृष्ट करण्यात आले तर आहेच त्याच बरोबर या कामाला वापरण्यात आलेले साहित्याची बिले जोडली आहेत ती बिले देखील बोगस असल्याचा संशय आहे. निकृष्ट कामासह जीएसटी बिला संबंधी मोठा घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता निर्माण झाली आहे . बोगस बिले घेऊन शासनाची फसवणूक करणाऱ्या गुत्तेदाराची चौकशी करावी या मागणीसाठी आंदोलन करण्यात येईल. – वैजनाथ घायतिडक ( उमरी, ग्रामस्थ)**

# प्रधानमंत्री आवास घरकूल योजना (शहरी) 2 चा लाभ घ्यावा : नगराध्यक्षा सौ.वंदनाताई जगताप यांचे आवाहन

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी नगरपंचायत हद्दीमधील सर्व नागरिकांसाठी आनंदाची बाब म्हणजे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २ अंतर्गत नविन घरकूल मंजुरी करिता नोंदणी सुरु झालेली असून तरी इच्छूक लाभार्थ्यांनी वेब पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी तसेच त्या सर्व कागदपत्रांची एक प्रत नगरपंचायत कार्यालयामध्ये जमा करावी असे आवाहन वडवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. वंदनाताई शेषेराव जगताप यांनी केले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, प्रधानमंत्री आवास योजनेमुळे गोरगरीब व सर्वसामान्यांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्णत्वास जात आहे. वडवणी शहरामध्ये प्रधानमंत्री आवास योजना आवास



योजना टप्पा क्रमांक एकमुळे हजारो गोरगरिबांचे आपले स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण झालेले आहे. आता उर्वरित रहिवाशांना हे आपल्या स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करता येणार आहे. याकरिता प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २ अंतर्गत नविन घरकूल मंजुरी करिता वेब पोर्टलवर इच्छूक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी. यासाठी आवश्यक पात्रता यामध्ये भारतामध्ये लाभार्थी तसेच कुटुंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे, लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही घरकूल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, कुटुंबातील वार्षिक उत्पन्न मर्यादा ३ लक्ष रुपये कमाल राहील. अशी यासाठी पात्रता असून नविन घरकूल नोंदणी ऑनलाईन करण्याकरिता खालील प्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत. यामध्ये विहित नमुन्यातील ऑनलाईन भरलेला अर्ज, अर्जदाराचे मोबाईल नंबर लिंक असलेले आधार कार्ड, तहसीलदार यांचेकडील चालू वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड, आधार लिंक असलेले बँकेचे पासबुक, पी.टी.आर रजिस्ट्री सातबारा हे जमिनीचे पुरावे, अर्जदार यांचे आई वडिलांचे आधार कार्ड तसेच जर ते हयात नसतील तर मृत्यू प्रमाणपत्र, अर्जदार यांचे कुटुंबामधील सर्व सदस्यांचे जसे की पती-पत्नी व मुले यांचे आधार कार्ड, पी.एस.स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी.एम. विश्वकर्मा इत्यादी योजनेचे लाभार्थी असल्यास नोंदणी क्रमांकाची प्रत आवश्यक आहे, भारत देशात कोठेही पक्के घर नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र व सद्यस्थितीतील घराचा फोटो अशाप्रकारे वरील संपूर्ण कागदपत्रांच्या मुळ प्रतींसह ऑनलाईन नोंदणी करावी व संपूर्ण कागदपत्रांची एक प्रत नगरपंचायत वडवणी कार्यालयात जमा करावी. अशा प्रकारे वडवणी नगरपंचायत हद्दीमधील सर्व नागरिकांनी या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २ या घरकूल योजनेचा लाभ घ्यावा

# अध्यात्माचा वसा आणि वारसा चालवण्यासाठी बीड जिल्ह्यातील मठाधिपतींचे मोठे योगदान: माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात धार्मिक क्षेत्रात वारकरी सांप्रदाय आणि भाविक भक्त मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन अध्यात्माचा वसा आणि वारसा चालवतात. जिल्ह्यातील मठाधिपती संत महंत हा वसा आणि वारसा चालवण्यासाठी मोठे योगदान देतात असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. बीड तालुक्यातील मंझरी हवेली येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह निमित्त रविवारी ह.भ.प.बबन महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते. त्यांच्यासोबत विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, सखाराम मस्के, नानासाहेब



काकडे , सुभाष क्षीरसागर, नवनाथ कुलकर्णी, सर्जेराव खटाणे, अर्जुन बहिरवाळ, अभिमान अवचट, उद्धव क्षीरसागर, अर्जुन शिंदे, वैभव क्षीरसागर आदी मान्यवर देखील उपस्थित होते. यावेळी ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या ३३ वर्षापासून मंजरी येथे अखंड हरिनाम सप्ताह अखंडपणे चालू आहे. ज्ञानेश्वर माऊली महाराज हे सर्वांना बरोबर घेऊन मंजरी गावात धार्मिक उत्सव साजरे करतात आपणही समाजासाठी काही देणे लागतो. या उदात्त भावनेने या ठिकाणी जे-जे विकास कामे करता येतील ते करत राहिलो. आज याच मंदिरात अनेक कार्यक्रम होत आहेत याचे समाधान वाटते. भव्य सभागृह असल्याने या ठिकाणी लग्न समारंभ देखील मोठ्या प्रमाणात होत आहेत.

# विशेष वार्षिक शिबीरात बालविवाह प्रतिबंधक रॅली सह व्याख्यानाचे आयोजन

**सफेपूर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि माऊली विद्यापीठ केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष वार्षिक शिबीरात बालविवाह प्रतिबंधक रॅली व व्याख्यान घेण्यात आले.

जिल्हा प्रशासन, महिला व बालविकास विभाग व डॉ. बा. आं. म. वि. छत्रपती संभाजीनगर (बालविवाह निर्मूलन प्रकल्प) राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या परिपत्रकान्वे सफेपूर गावात सकाळच्या सत्रात रासेयो



स्वयंसेवकांची बालविवाह प्रतिबंधक रॅली काढण्यात आली. तर दुपारच्या सत्रात 'बालविवाह समस्या व प्रतिबंधक उपाययोजना' विषयावर व्याख्यान घेण्यात आले. या प्रसंगी व्याख्याते म्हणून डॉ. मातकर व्ही. बी. व मुख्याध्यापक जी.एस. साळुंके यांची उपस्थिती होती. यावेळी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना मातकर म्हणाले की, कायद्यानुसार मुलीच्या विवाहाचे वय अठराव्या तर मुलांचे एकवीस आहे. परंतु मुलीचे बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे. सदृढ पिढीसाठी योग्य वयात विवाह होणे सायंटिफिक रिजन आहे. त्यामुळे माता व अपत्याच्या जिवास धोका निर्माण होत नाही. जी. एस. साळुंके मार्गदर्शन करताना म्हणाले की. बीड जिल्हा बालविवाह समस्येने ग्रासलेला जिल्हा आहे. बाल विवाह झालेल्या मुला-मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकलावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाची शासकीय रेखाकला परीक्षेत गरुडझेप!

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचालित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचा शासकीय रेखाकला आणि यंत्रकला, चित्रकला परीक्षेचा निकाल ९२% टक्के लागल्यामुळे गरुडझेप घेतल्याबद्दल आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड या संस्थेचे अध्यक्ष बी. एस. धुतालमल, सचिव ॲड. व्ही.बी.मगर व सर्व संचालक, मुख्याध्यापक बी. ए.हावळे आणि चित्रकाला मार्गदर्शक डब्ल्यू.एस.वाघमारे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. या स्पर्धेमध्ये मोरे अजय, जाधव रितेश, ढोकणे ऋतिक, गाडे सुमित, काकडे करण, सिरसट अशोक, या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले.

# अक्षरांच्या मोत्यातून बहरला शब्दांचा मळा

**बीड । प्रतिनिधी**

संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली / दुसरी विभागामध्ये मराठी विषय समितीमार्फत भाषा कौशल्य विकास उपक्रमांतर्गत इयत्ता पहिलीसाठी अनुलेखन व दुसरी साठी श्रुतलेखन हा उपक्रम घेण्यात आला. बालगोपालांनी आपला ज्ञानाचा उपयोग करून शब्दांचे लेखन केले. उपक्रमात विद्यार्थ्यांनी सुंदर हस्ताक्षर चा परिचय देऊन शब्दांचे अचूक लेखन केले. विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य विकासासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्रवण कौशल्य , आकलन क्षमता , लेखनाची आवड निर्माण करणे आदी उद्दिष्टे समाविष्ट करून या उपक्रमाची मांडणी करण्यात आली होती. उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साही वातावरणात सहभाग घेऊन उपक्रम पूर्ण केला . माननीय मुख्याध्यापिका जाधव ताई विभाग प्रमुख श्रीमती पारगावकर ताई यांच्या मार्गदर्शनानुसार उपक्रम घेण्यात आला.



## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. आर.आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई**
**गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क. ४१/२०२५**
**विक्रम वि. निरंक**
**(मार्फत ॲड. ए. ए. आरबड, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे गिताबाई शाहुराव पुरी, मौजे रा. गुंतेगाव, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक १८/१२/२०२४ रोजी मौजे रा. गुंतेगाव, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) विक्रम शाहुराव पुरी, वय ५७, धंदा शेती, रा.गुंतेगाव, ता. गेवराई, जि.बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत गिताबाई शाहुराव पुरी, मौजे रा. गुंतेगाव, ता. गेवराई, जि. बीड हे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक २०/०१/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले..

**पुढील तारीख ०७/०३/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश-४, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : ३०/२०२५**

अर्जदार- मिना भ्र. प्रविण तांदळे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. आंबिलवडगांव. ता. जि.बीड

विरूध्द

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

अर्जदारातर्फे वकिल- ॲड. एस.बी.खाडे, बीड

मागणी- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता भाडेपटटा करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार मिना भ्र. प्रविण तांदळे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. आबिलवडगांव, ता. जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान मुलगा शिक्षण याची सख्खी आई असुन अज्ञानाची नामे आदित्य पि. प्रविण तांदळे, वय ०७ वर्षे, धंदा पालनकर्ती आहे. अज्ञानाचे नावे असलेले मौजे अंबिलवडगांव हाददीतील गट नं. ३३७ मधिल क्षेत्रफळ ०-८० हे. आर. अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत भाडेपटटा करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल

आज दिनांक २०/ ०१ / २०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **प्रकरणातील पुढील तारीख : २५/०२/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

CMYK

# बीड शहराच्या पश्चिमेला वळण रस्ता द्या आणि धुळे-सोलापूर महामार्गाची दुरुस्ती करा : मुळूक, गलधर

## बीडच्या रस्ते प्रश्नासंदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सकारात्मक



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील मुख्य रस्त्यांच्या दुरुस्ती व नागरिकांच्या सुविधासंदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व स्वप्नील गलधर यांनी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन निवेदन दिले. बीड शहराच्या पश्चिम बाजूने (नगर रोड) जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गा ५६१ वर वळण रस्ता करावा अशी मागणी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली तर शहरातून जाणाऱ्या सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गाची दुरुस्ती करुन सुविधा देण्यात याव्यात अशी मागणी जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी निवेदनाद्वारे केली. यावेळी बीडच्या रस्त्यांच्या प्रश्नासंदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे मुळूक, गलधर यांनी सांगितले.

बीड शहरातून राष्ट्रीय महामार्ग ५६१ आणि सोलापूर-धुळे महामार्ग असे दोन महामार्गा गेले आहेत. यामुळे शहराच्या वैभवात पडली असली तर या रस्त्यांच्या कामात काही त्रुटी राहिल्या आहेत. या संदर्भात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शहराला वळण रस्त्याची गरज असल्याचे गडकरींच्या निदर्शनास आणून दिले. शहरातून पश्चिम बाजूने (नगर रोड) राष्ट्रीय महामार्ग ५६१ जातो. सध्या या रस्त्याचे रुंदीकरण करुन सिमेंट रस्ता बनविण्याचे काम सुरु आहे. हा रस्ता पुढे नगर, पुणे, मुंबईला जोडला जात असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. परिणामी अपघाताचे प्रमाण वाढलेआहे. यामुळे शहराच्या पश्चिम बाजूने जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५६१ वर वळण रस्ता करावा, अशी मागणी मुळूक यांनी केली. यामुळे नगर, पुणे, मुंबईकडे जाणारी वाहतूक शहराबाहेरुन जाईल आणि शहरातील वाहतुकीचा प्रश्न सुटेल असेही त्यांनी म्हटले आहे. जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी गडकरींसमोर सोलापूर- धुळे राष्ट्रीय महामार्गावरी त्रुटी निदर्शनास आणून दिल्या. बीड शहरातून जाणाऱ्या धुळे-सोलापूर महामार्ग (NH-52) ची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. रस्त्यावरील खड्डे, तुटलेल्या दिशादर्शक फलक, रस्त्यांच्या किनाऱ्यावरील भागाची दुरावस्था, तसेच शौचालय व साफसफाईच्या अभावामुळे प्रवाशांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या कारणाने अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. शहराजवळील महालक्ष्मी चौक ते छ. संभाजी महाराज चौक या मार्गावर शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र सर्व्हिस रोडची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.



*मस्साजोग येथील सरपंच मयत संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी यशवंत भवन अकोला येथे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. याभेटी दरम्यान देशमुख कुटुंबीयांनी संतोष देशमुख यांच्या हत्येविषयी माहिती दिली.*

# संविधान अमृत महोत्सवा निमित्त पुणे मंबई विभागीय कविसंमेलनाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

मानव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषद महाराष्ट्र व्दारा संविधान अमृत महोत्सवा निमित्त पुणे मुंबई विभागीय कविसंमेलनाचे दि.२४.०१.२०२५.रोजी दुपारी १२ ते सांय.४ वाजे पर्यत एस एम जोशी सभागृह, पत्रकार भवन शेजारी नवीपेठ, पुणे येथे आयोजन करण्यात आलेले आहे. कविसंमेलनाचे उद्धघाटक डॉ. दत्तात्रेय गायकवाड विचारवंत सुप्रसिद्ध साहित्यिक पुणे करणार आसुन प्रमुख पाहूणे लेखक कवी दिग्दर्शन ह्रदयमानव अशोक व जित्या जाली(जितेन सोनवणे) सुप्रसिद्ध कविवर्य उपस्थित राहाणार आहेत. उद्धघाटन सत्राच्या अध्यक्षस्थान धी.चंद्रप्रकाश जी. शिंदे (अध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.)हे भुषवणार आहेत.सुत्र संचालन किरण प्रकाश जिलाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.पुणे, प्रस्तावित सुभाष गवळी (राज्य कर्यकारिणी सदस्य मा.प्र.सृ.सा. प.)करणार आहेत. अंमत्रित कवी रवि कांबळे(पुणे), देविलाल रैराळे (अमरावती), सागर वाघमारे(मावळ पुणे), कवयित्री कविता काळे(हाडपसर पुणे), सुभाष वाघमारे (वालचंद नगर)कवियित्री पोर्णीमा कुंभारकर (सासवड), तानाजी शिंदे (उदगीर), शब्दश्वर मंगरुळकर(जुन्नर)

## राधा गोविंदांचा हजार किलो पाकळ्यांनी पुष्पाभिषेक

**बीड । प्रतिनिधी**

फुलो मे सज रहे है श्री वृंदावन बिहारी या गजरामध्ये श्री श्री राधा गोविंद यांचा २२ वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने श्री राधा गोविंद मंदिरामध्ये हजार किलो पाकळ्यांच्या पुष्पाभिषेकाने साजरा झाला. यावेळी हजारो भाविकांसाठी किर्तन प्रवचन पुष्पा अभिषेक व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.१५ जानेवारी पासुन या उत्सवाची सुरुवात श्रीमान ध्रुवनारायण प्रभू यांच्या द्वारे कालिया दमन लिला कथा दुपारी चार ते सात या वेळेत झाली.

# मैत्रा फाउंडेशन बीडच्या वतीने अंबानगरीचे सुपुत्र तथा कवी भागवत मसने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मैत्रा फाउंडेशन बीड या सामाजिक संस्थेच्या वतीने अंबाजोगाई शहराचे सुपुत्र तथा सुप्रसिद्ध कवि भागवत रामकृष्ण (बी आर ) मसने यांची राज्यस्तरीय आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले. या सन्मान सोहळ्याप्रसंगी जेष्ठ समाजसेवक गौतम खटोड , प्रा गाडेकर,मैत्रा फाउंडेशनचे अध्यक्ष द ल वारे, जिल्हाध्यक्ष संजय राठोड , पत्रकार संग्राम धनवे, श्रीमती हर्षा ढाकणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम दि १९ रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन, बीड येथे संपन्न झाला. या सन्मान सोहळ्यासाठी राज्यभरातून अनेक शिक्षक देखील सहभागी झाले होते.

नुकतेच मैत्रा फाउंडेशन च्या वतीने सन्मानित करण्यात आलेले सुप्रसिद्ध कवि तथा शिक्षक भागवत मसने हे कवी म्हणून देखील सर्वदूर सुपरीचीत आहेत . त्यांनी आपल्या शैक्षणिक विषयां सोबसतच अनेक प्रकारच्या कवितांच्या माध्यमातून केवळ अंबाजोगाई शहरातच नव्हे तर राज्यभरात विविध ठिकाणच्या कवी संमेलनाच्या माध्यमातून विविध विषयांवर प्रकाश टाकला आहे. भागवत रामकृष्ण मसने यांचे इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतचे शिक्षण हे खोलेश्वर विद्यालय व महाविद्यालयात झाले आहे. १९८९ साली बारावीत असतानाच के. के. एम. कॉलेज मानवत येथे झालेल्या वाद विवाद स्पर्धेत भागवत मसने यांना मराठवाडा स्तरावरील प्रथम



क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. पुढे स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात नाट्यशास्त्र विषयात पदवी प्राप्त केली. या महाविद्यालयीन जीवनात वाद विवाद स्पर्धा , वक्तृत्व स्पर्धा , काव्यवाचन स्पर्धा ,अशा विविध प्रकारच्या स्पर्धांमधून एकूण ३२ बक्षीस मिळवण्याचा बहुमान प्राप्त केला आहे . वैयक्तिक सन्मानासह भागवत मसने यांनी तालुकास्तर , कधी जिल्हा तर कधी मराठवाडा विद्यापीठ त्याचबरोबर कधी महाराष्ट्रातुन सांघिक पारितोषिक स्वामी रामानंद महाविद्यालयालास प्राप्त करून दिले आहेत. एम ए हिंदी ही डिग्री पूर्ण झाल्यानंतर तासिका तत्त्वावर श्री योगेश्वरी महाविद्यालय वरिष्ठ स्तरावर प्राध्यापक म्हणून सात वर्ष काम करतांना अनेक विद्यार्थी वक्तृत्व तसेच वादविवाद स्पर्धेत घडवले. २००२ साली श्री योगेश्वरी नूतन विद्यालयात रुजू झाल्यापासून आजपर्यंत येथेही अनेक विद्यार्थी घडवत आहेत. त्यांनी स्वतः पाच एकांकिका व पाच गीते लिहून विद्यालयाच्या विद्यार्थी चमूद्वारे बीड आकाशवाणीवर सादर करण्याच्या बहुमान मिळवला आहे.

## निवडणूक निर्णय अधिकारी नाम तालिका तयार करणेबाबत

**बीड । प्रतिनिधी**

ई वर्गातील संस्था म्हणजेच २५० पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी सभासद असणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी दिनांक २० जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांची नामतालिका पॅनल तयार करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज १ शासकीय विभागातील (सहकार विभागातील कार्यरत अधिकारी,कर्मचारी वगळून) स्थानिक स्वराज्य संस्थेतील, सहकारी संस्थेतील कार्य कायम कार्यरत अधिकारी, कर्मचारी (वरिष्ठ लिपिक किंवा त्यापेक्षा जादा दर्जा असलेल्या कर्मचारी ) प्रामाणित लेखापरीक्षक, वकील ( पाच वर्षाचा कामाचा अनुभव) शासकीय सेवेतून,स्थानिक स्वराज्य संस्थेतून सेवानिवृत्त झालेला अधिकारी, कर्मचारी (वयाचे ६५ वर्षे पेक्षा जास्त नसलेल्या) यांच्याकडून अर्ज मागविण्यात आले आहे. विहित नमुन्यातील अर्ज दिनांक २० जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळू शकतील तसेच या संदर्भातील विहित नमुन्यातील अर्ज जाहीर नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहेत. अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज ३१ जानेवारी २०२५ अखेर खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्याची दक्षता घ्यावी. याबाबतची जाहीर सूचना विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

# मानवी जीवनावर साधू- संतांचे अनंत उपकार : ह.भ.प.विवेकानंद शास्त्री

## गेवराईत संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या भव्य कीर्तन महोत्सवास भाविकांचा प्रतिसाद

**तलवाडा । प्रतिनिधी**

आज विज्ञानाने माणसाच्या जीवनात अमुलाग्र बदल करुन क्रांती केली आहे. तांत्रिक सुविधा, नवनविन साधन सामुग्री आली आहे परंतू त्यामुळे माणसं अशांत होवून तर बैचेन आहेत. सुख समाधान राहिले नाही. तर मोबाईलमुळे संवाद हरवत चालला आहे. परंतू आनंदी जीवन जगण्यासाठी ज्ञानयज्ञ भक्ती मंडपात येवून साधू संतांचा संग धरा जीवनात आनंद मिळेल. साधू - संत हे समाजाला निस्वार्थ भावनेतून सुखाचा मार्ग दाखवतात तसेच मानवी जीवनावर साधू -



संतांचे अनंत उपकार आहेत असे प्रतिपादन श्रीक्षेत्र सिध्देश्वर संस्थांनचे मठाधिपती ह.भ.प. विवेकानंद शास्त्री महाराज यांनी व्यक्त केले. गेवराई येथे संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने संत भगवानबाबा व संत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुरु असलेल्या २० व्या भव्य कीर्तन महोत्सवात रविवार दि.१९ जानेवारी रोजी ह.भ.प.स्वामी विवेकानंद शास्त्री मठाधिपती, सिध्देश्वर संस्थान, शिरुर (का.) यांची कीर्तनसेवा झाली यावेळी ते बोलत होते. यावेळी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत गुरुवर्य दत्ता महाराज गिरी यांच्यासह महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी त्यांनी संतश्रेष्ठ तुकोबाराय यांच्या

भव्य कीर्तन महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी संत - भाऊ बाबा सेवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. कीर्तन महोत्सवाला गेवराईत भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# आंबेजोगाई येथे २८ जानेवारी रोजी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज, दक्षिण पीठ, नाणीज धाम, यांचा २८ जानेवारी रोजी, रामदेव बाबा मंदिर ट्रस्ट, श्री संजय किशनराव भोसले (मुख्य प्रवर्तक) यांच्या शेतात आनंद नगर येथे, आंबेजोगाई शहरांमध्ये भव्य पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन केलेले आहे.

जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या स्व-स्वरूप संप्रदायाच्या वतीने देशभरामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून समाज उपयोगी कार्य केले जाते यात संस्थांनच्या वतीने विनामूल्य ५४ म्बुलन्स राष्ट्रीय महामार्गावर चालतात, गोरगरीब व गरजू मुलांना इंग्रजी माध्यमाचे श्रज्ञस ते बारावीपर्यंत शिक्षण



मोफत दिलं जातं, हिंदू धर्मातून इतर धर्मात गेलेल्या लोकांना हिंदू धर्मात परत आणून त्यांचा रोटी बेटीचा व्यवहार संप्रदायामार्फत चालू करून दिला आहे, लाखो लोकांची व्यसन मुक्ती आजपर्यंत महाराजांनी केली आहे, आताच ४ जानेवारी ते १९ जानेवारी दरम्यान या पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये सांप्रदायाच्या माध्यमातून १ लाख ३६ हजार २७० रक्त कुपेकेच सांप्रदायाच्या मार्फत महाराष्ट्र शासनाला दान करण्यात आलं हा विश्व विक्रमच आहे, ७ अवयव दान या संप्रदायाच्या माध्यमातून झालेले आहेत, त्याचबरोबर ७८ देहदान मेडिकल कॉलेजला आजपर्यंत सांप्रदायामार्फत सुपुर्द करण्यात आलेले आहेत, मागे महाड, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी येथे पूर परिस्थिती निर्माण झाली त्यावेळेला सांप्रदायामार्फत मदतीचा हात देण्यात आला त्यामध्ये धान्यवाटप असेल साफ सफाईचे कामे असतील हे सर्व सांप्रदायमार्फत केले गेले, असे अनेक विविध उपक्रम सांप्रदायामार्फत राबविण्यात येत आहेत दरवर्षी पादुका दर्शन सोहळ्याच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असेल, शाळेला प्रयोग शाळेचे साहित्य वाटप असेल, शेतकऱ्यांना गाई, म्हशी, शेळ्यांचे, कृषी साहित्याचे, बियाणाचे वाटप असेल, असे अनेक उपक्रम सांप्रदायमार्फत समाज उपयोगी चालवले जातात.

